# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**परिपत्रक क्र. आस्था/आरओ/३८/२०२४**

**संदर्भः- मा. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी १९ औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ औरंगाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.२०२४/लो.सा.नि./कावि-३४, दि.०७/०५/२०२४ रोजीचे पत्र.**

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी यांनी असे कळविले आहे की, सार्वत्रिक निवडणुक प्रक्रीयेत दि.१३ मे २०२४ रोजी जालना व औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रीया पार पाडली जाणार आहे. त्या दृष्टीकोनातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागामार्फत अनेक उपक्रम राबविले जात आहेत. दि. ११ व १२ मे २०२४ रोजी सुटी असल्याकारणाने व दि.१३ मे २०२४ रोजी मतदान करण्यासाठी सुटी दिल्या कारणाने आपल्या अधिनिस्त अधिकारी/कर्मचारी यांनी दि.१३ मे २०२४ रोजी मुख्यालयी हजर राहण्यासंदर्भात व ज्या ठिकाणी त्यांचे मतदान आहे त्या ठिकाणी त्यांनी मतदान करावे यासाठी त्यांना निर्देशित करण्यात यावे. तसेच दि.१४ मे २०२४ रोजी आपल्या कार्यालयातील व क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी मतदान केले असल्यासंदर्भात बोटाची शाई तपासून खातरजमा करण्यात यावी. तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी मतदान केले नाही त्यांची यादी दि. १६ मे २०२४ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी १९- औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ कार्यालयाकडे सादर करावी असे कळविले आहे.

सबब, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या अधिनस्थ शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी मतदान केल्याची खातरजमा करण्यात येऊन तसा अहवाल आस्थापना विभागास दि.१४/०५/२०२४ रोजी सादर करण्यात यावा.

संबंधित कर्मचाऱ्यांचे नाव इतर लोकसभा मतदारसंघात असल्यास तसेही नमुद करावे.

तसेच निवडणूक कामासाठी प्रतिनियुक्त असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आणि दि.१३/०४/२०२४ रोजी निवडणूक कामी नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मतदानाबाबत आपल्या विभाग प्रमुखांना कळवावे.

सदरील माहिती सादर न केल्यास याबाबत मा. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडुन होणाऱ्या कार्यवाहीस संबंधीत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२४/ )(
दिनांक :- ०८-०५-२०२४ )(

**कुलसचिव**

*****

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तवः-
१) संचालक, विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.
२) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख,
३) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख,
४) संचालक, युनिक,
५) जनसंपर्क अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

# निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, १९-औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, छत्रपती संभाजीनगर

Email I.D. dydeoaurangabad@gmail.com


जा.क्र.२०२४/लो.सा.नि./कावि-३१ दिनांक -०७.०५.२०२४

प्रति,

कुलसचीव, डॉ. बाबासाहेब
आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ,
छ. संभाजीनगर.

**विषयः दिनांक १३ मे २०२४ रोजी होऊ घातलेल्या मतदान प्रक्रीयेत आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी मतदान करणेबाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने सार्वत्रिक निवडणूक प्रक्रीयेत दिनांक १३ मे २०२४ रोजी जालना व औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रीया पार पाडली जाणार आहे. त्या दृष्टीकोनातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागामार्फत अनेक उपक्रम राबविले जात आहेत. दिनांक ११ व १२ मे २०२४ रोजी सुटी असल्याकारणाने व दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदान करण्यासाठी सुटी दिल्या कारणाने आपल्या अधिनिस्त अधिकारी / कर्मचारी यांनी दिनांक १३ मे २०२४ रोजी मुख्यालयी हजर राहण्यासंदर्भात व ज्या ठिकाणी त्यांचे मतदान आहे त्या ठिकाणी त्यांनी मतदान करावे यासाठी त्यांना निर्देशित करण्यात यावे.

तसेच दिनांक १४ मे २०२४ रोजी आपल्या कार्यालयातील व क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी मतदान केले असल्यासंदर्भात बोटाची शाई तपासून खातरजमा करण्यात यावी. तसेच ज्या अधिकारी / कर्मचा-यांनी मतदान केले नाही त्यांची यादी दिनांक १६ मे २०२४ रोजी या कार्यालयाकडे सादर करावी.

**(दिलीप स्वामी भा.प्र.से.)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**१९- औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ**

प्रतिलिपी :- मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.